# राजभवन पत्रिका

२०२३



राजभवन, महाराष्ट्र




राज्यपाल रमेश बैस यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांची राष्ट्रपती भवन, नवी दिल्ली येथे सपत्नीक सदिच्छा भेट घेतली. २८.०२.२०२३

Maharashtra Governor Ramesh Bais accompanied by Smt Rambai Bais called on the President of India Smt. Droupadi Murmu at Rashtrapati Bhavan, New Delhi. 28.02.2023

# राजभवन पत्रिका

२०२३

राज्यपाल श्री रमेश बैस यांच्या महाराष्ट्राच्या
राज्यपाल पदाच्या पहिल्या महिन्यातील
कार्यक्रमांवर आधारित कार्य अहवाल
दिनांक १८ फेब्रुवारी - १८ मार्च २०२३

जनसंपर्क शाखा, राजभवन

# राजभवन पत्रिका

## संपादकीय सल्लागार

**संतोष कुमार, भा.प्र.से.**
मा. राज्यपालांचे प्रधान सचिव

**अजय कुमार**
मा. राज्यपालांचे विशेष सचिव

**श्वेता सिंघल, भा.प्र.से.**
मा. राज्यपालांच्या सहसचिव

**महेश गोलानी**
मा. राज्यपालांचे विशेष कार्य अधिकारी

## समन्वय

**उमेश काशीकर**
मा. राज्यपालांचे जनसंपर्क अधिकारी

## विशेष आभार

**राजभवनातील अधिकारी व कर्मचारी**
**रमेश पाटील,** जनसंपर्क शाखा, राजभवन
**धीरज पेडेकर,** जनसंपर्क शाखा, राजभवन

## छायाचित्रे

**माहिती व जनसंपर्क विभाग, महाराष्ट्र शाखा**
**पराग कुलकर्णी**
**संदीप यादव**
**शुभम जामदार**

## मांडणी व सजावट

**नागोराव रोडेवाड, प्रशांत जाधव**

## अनुक्रमणिका


- आगमन व शपथविधी ०१-०८
- अर्थसंकल्पीय अधिवेशन ०९-१३
- मान्यवरांच्या भेटी १४-२३
- शिक्षण २४-२६
- भेटी व कार्यक्रम २७-३९
- राजभवन परिवार ४०-४४

# नवनियुक्त राज्यपालांचे आगमन आणि स्वागत

# Arrival and Reception of Governor



दिनांक १२ फेब्रुवारी २०२३ रोजी राष्ट्रपती भवन येथून जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकानुसार झारखंडचे राज्यपाल असलेल्या रमेश बैस यांची महाराष्ट्राच्या राज्यपाल पदावर नियुक्ती जाहीर केली. त्यानंतर दिनांक १७ फेब्रुवारी २०२३ रोजी राज्यपाल बैस यांचे मुंबई येथे आगमन झाले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव व इतर मान्यवरांनी त्यांचे स्वागत केले. १७.०२.२०२३

The Rashtrapati Bhavan announced the appointment of Jharkhand Governor Ramesh Bais as the Governor of Maharashtra by a Press Communique on 12th February 2023. The new Governor-designate of Maharashtra Ramesh Bais accompanied by Smt Rambai Bais arrived in Mumbai on 17th February 2023. Chief Minister Eknath Shinde, Guardian Minister of Mumbai Suburban District Mangal Prabhat Lodha, Chief Secretary Manukumar Shrivastav and others welcomed him. 17.02.2023

# राजभवन येथे आगमन व स्वागत
# Arrival and Reception at Raj Bhavan





राजभवन येथे आगमन प्रसंगी राज्यपाल रमेश बैस व श्रीमती रामबाई यांचे राज्यपालांचे प्रधान सचिव संतोष कुमार, सहसचिव श्वेता सिंघल व प्राची जांभेकर तसेच इतर अधिकाऱ्यांनी स्वागत केले. यावेळी महिला कर्मचाऱ्यांतर्फे राज्यपालांचे पारंपरिक पद्धतीने ओवाळून स्वागत करण्यात आले. १७.०२.२०२३

The Governor - designate was given a traditional welcome on his arrival. Principal Secretary to the Governor Santosh Kumar, Joint Secretaries Shweta Singhal and Prachi Jambhekar and other officers welcomed the Governor and his family. 17.02.2023

# शपथविधी

# Rashtrapati Bhavan
## Press Communique

The President of India | Smt. Droupadi Murmu

Contact | Feedback | Sitemap

Home | Press Releases | Speeches | Gallery | Rashtrapati Bhavan | Former Presidents | E- Art Catalogue

Home › Press Releases › Press Releases Detail

Tweet

### Press Communique

**PRESIDENT OF INDIA APPOINTS GOVERNORS**

Rashtrapati Bhavan : 12.02.2023

The President of India has accepted the resignations of Shri Bhagat Singh Koshyari as Governor of Maharashtra and Shri Radha Krishnan Mathur as Lt. Governor of Ladakh.

2. The President of India is pleased to make the following appointments:-

(i)Lt. General Kaiwalya Trivikram Parnaik, PVSM, UYSM, YSM (Retired) as Governor of Arunachal Pradesh

(ii)Shri Lakshman Prasad Acharya as Governor of Sikkim

(iii)Shri C.P. Radhakrishnan as Governor of Jharkhand

(iv)Shri Shiv Pratap Shukla as Governor of Himachal Pradesh

(v)Shri Gulab Chand Kataria as Governor of Assam

(vi)Shri Justice (Retd.) S. Abdul Nazeer as Governor of Andhra Pradesh

(vii)Shri Biswa Bhusan Harichandan,Governor of Andhra Pradesh appointed as Governor of Chhattisgarh

(viii)Sushri Anusuiya Uikye, Governor of Chhattisgarh appointed as Governor of Manipur

(ix)Shri La. Ganesan, Governor of Manipur appointed as Governor of Nagaland

(x)Shri Phagu Chauhan, Governor of Bihar appointed as Governor of Meghalaya

(xi)Shri Rajendra Vishwanath Arlekar, Governor of Himachal Pradesh appointed as Governor of Bihar

(xii)Shri Ramesh Bais, Governor of Jharkhand appointed as Governor of Maharashtra

(xiii) Brig. (Dr.) Shri B.D. Mishra (Retd.), Governor of Arunachal Pradesh appointed as Lt. Governor of Ladakh

3. The above appointments will take effect from the dates they assume charge of their respective offices.

# राज्यपाल रमेश बैस यांचा शपथविधी संपन्न



त्रिपुरा तसेच झारखंडचे राज्यपाल राहिलेल्या रमेश बैस यांनी दिनांक १८ फेब्रुवारी २०२३ रोजी महाराष्ट्राच्या राज्यपाल पदाची शपथ घेतली. राजभवन मुंबई येथील दरबार हॉल येथे झालेल्या शपथविधी सोहळ्यात मुंबई उच्च न्यायालयाचे प्रभारी मुख्य न्यायमूर्ती संजय गंगापूरवाला यांनी राज्यपालांना पदाची शपथ दिली. राज्यपालांनी मराठीतून शपथ घेतली.

शपथविधीनंतर व्यासपीठावर उपस्थित असलेल्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यपालांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले

सुरुवातीला मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव यांनी राज्यपालांच्या नियुक्तीबाबत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काढलेल्या अधिसूचनेचे वाचन केले. राष्ट्रगीताने शपथविधी सोहळ्याची सुरुवात व सांगता झाली. शपथविधी सोहळ्यानंतर भारतीय नौदलातर्फे राज्यपालांना मानवंदना देण्यात आली.

कार्यक्रमाला राज्यपालांच्या पत्नी रामबाई बैस, केंद्रीय राज्यमंत्री समाज कल्याण व सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले, राज्याचे पर्यटन व महिला आणि बालकल्याण मंत्री मंगलप्रभात लोढा, विधान सभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, लोकायुक्त विद्यासागर कानडे, राज्य मानवी हक्क आयोगाचे अध्यक्ष न्या. (नि.) के के तातेड, लोकप्रतिनिधी, विविध विभागांचे सचिव, वरिष्ठ पोलीस अधिकारी तसेच निमंत्रित नागरिक उपस्थित होते.

**महाराष्ट्राचे राज्यपाल श्री रमेश बैस यांचा अल्प परिचय**

दिनांक १८ फेब्रुवारी २०२३ रोजी महाराष्ट्राच्या राज्यपाल पदाची शपथ घेतलेले श्री रमेश बैस पूर्वीचे मध्यप्रदेश व सध्याच्या छत्तीसगड राज्याच्या तसेच राष्ट्रीय राजकारणातील एक आदरणीय नाव आहे.

संसदीय राजकारण, समाजकारण तसेच संघटन कार्याचा तब्बल पाच दशकांचा प्रदीर्घ अनुभव असलेल्या मा. रमेश बैस यांनी सार्वजनिक जीवनात नगरसेवक पदापासून केंद्रीय राज्यमंत्री व राज्यपाल पदापर्यंत विविध जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडलेल्या आहेत.

दिनांक २ ऑगस्ट १९४७ रोजी रायपूर (छत्तीसगड) येथे जन्मलेले श्री. रमेश बैस यांचे शिक्षण रायपूर येथे झाले.

सन १९७८ साली ते पहिल्यांदा रायपूर महानगर पालिकेत नगरसेवक म्हणून निवडून आले. सन १९८० ते १९८५ या कालावधीत ते मध्यप्रदेश विधान परिषदेचे सदस्य होते. याकाळात त्यांनी मध्यप्रदेश विधानमंडळाच्या अंदाजपत्रक समितीचे तसेच त्यानंतर ग्रंथालय समितीचे सदस्य म्हणून काम केले. सन १९८२ ते १९८८ या कालावधीत ते मध्यप्रदेश भारतीय जनता पक्षाचे प्रदेश मंत्री देखील होते.




सन १९८९ साली श्री बैस रायपूर येथून पहिल्यांदा लोकसभेवर निवडून गेले. त्यानंतर तब्बल सहा वेळा, म्हणजे एकूण सात वेळा लोकसभेवर निवडून जाण्याचा त्यांनी विक्रम केलेला आहे.

सन १९९८ साली पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या मंत्रिमंडळात श्री रमेश बैस यांची पोलाद व खाण मंत्रालयात राज्यमंत्री म्हणून नियुक्ती झाली.

सन १९९९ ते २००४ या कालावधीत त्यांनी रसायने व खते व त्यानंतर माहिती व प्रसारण खात्याचे राज्यमंत्री म्हणून काम पहिले.

सन २००३ साली श्री रमेश बैस यांना केंद्रीय खाण मंत्रालयामध्ये राज्यमंत्री पदाचा स्वतंत्र कार्यभार देण्यात आला व त्यानंतर काही काळ ते केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालयात राज्यमंत्री (स्वतंत्र कार्यभार) होते.

आपल्या प्रदीर्घ सांसदीय जीवनात श्री बैस यांनी पेट्रोलियम व नैसर्गिक वायु विषयक संसदीय समिती, लोकलेखा समिती, ऊर्जा मंत्रालय सल्लागार समिती, कोळसा आणि खाण मंत्रालयाची हिंदी सल्लागार समिती, नियम समिती आदी समित्यांचे सदस्य म्हणूनही कामकाज पाहिलेले आहे.

सन २००९ ते २०१४ या काळात श्री रमेश बैस भारतीय जनता पक्षाचे लोकसभेतील मुख्य प्रतोद होते. सन २०१४ ते २०१९ या काळात १६ व्या लोकसभेचे सदस्य असताना ते सामाजिक न्याय व सक्षमीकरण विषयावरील संसदीय स्थायी समितीचे अध्यक्ष होते. श्री बैस यांनी दिव्यांग व्यक्ती तसेच तृतीयपंथी (ट्रान्सजेंडर )व्यक्ती अधिकार सुरक्षा विधेयका संदर्भात व्यापक संशोधन व अध्ययन केले आहे.

सन २०१९ साली श्री रमेश बैस यांची राज्यपाल पदावर नियुक्ती करण्यात आली. दिनांक २९ जुलै २०१९ ते १३ जुलै २०२१ या काळात ते त्रिपुराचे राज्यपाल होते. त्यानंतर दिनांक १४ जुलै २०२१ रोजी त्यांची झारखंडच्या राज्यपालपदी बदली करण्यात आली. दिनांक १८ फेब्रुवारी २०२३ रोजी श्री रमेश बैस यांनी महाराष्ट्राचे राज्यपाल म्हणून पदग्रहण केले.

राज्यपाल श्री रमेश बैस यांना समाजसेवेची आवड असून त्यांनी अनेकदा आरोग्य शिबीरे, नेत्र तपासणी शिबीर, तसेच ग्रामीण भागांमध्ये क्रीडा स्पर्धांचे आयोजन केले आहे. श्री रमेश बैस यांनी छत्तीसगड धनुर्विद्या ऑलिम्पिक संघटनेचे अध्यक्ष म्हणून देखील काम केले आहे. मध्य प्रदेश बीज व कृषी विकास महामंडळाचे अध्यक्ष म्हणून देखील त्यांनी काम केले आहे.

महाराष्ट्राला अशा प्रकारचे विविधांगी कार्यानुभव असलेले व्यक्तिमत्त्व राज्यपाल म्हणून लाभलेले आहे.

# Ramesh Bais sworn in as 20th Governor of Maharashtra

Former Tripura and Jharkhand Governor Ramesh Bais was sworn in as the 20th Governor of Maharashtra at Raj Bhavan Mumbai on Saturday, 18th February 2023.

Acting Chief Justice of the Bombay High Court Justice Sanjay Gangapurwala administered the oath of office to Governor Ramesh Bais.

Maharashtra Chief Minister Eknath Shinde who was present on the dais congratulated the Governor by presenting a bouquet of flowers after the swearing in ceremony.

Earlier State Chief Secretary Manukumar Shrivastava read out the Warrant of Appointment issued by the President of India, Droupadi Murmu, appointing Ramesh Bais as the Governor of Maharashtra.

The Swearing in Ceremony began and concluded with the National Anthem played by the ceremonial police band. A Guard of Honour was presented to the Governor by the Indian Navy soon after the oath taking ceremony.

Spouse of the Governor Smt Rambai Bais, Union Minister of State for Social Justice and Empowerment Ramdas Athawale, Maharashtra's Minister for Tourism and Women and Child Welfare Mangal Prabhat Lodha, Speaker of Maharashtra Legislative Assembly Rahul Narwekar, Lokayukta Justice (retd) Vidyasagar Kanade, Chairman of Maharashtra State Human Rights Commission Justice (retd) K K Tated, people's representatives, secretaries of various departments, senior police officers and invitees were present. **18.02.2023**




https://fb.watch/jpeNx6jXHa/

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

मी, रमेश बैस ईश्वरसाक्ष शपथ घेतो की, मी, महाराष्ट्राच्या राज्यपाल पदाचे कार्यपालन निष्ठापूर्वक करीन आणि माझ्या संपूर्ण क्षमतेनिशी संविधान व कायदा यांचे जतन, संरक्षण व प्रतिरक्षण करीन आणि मी स्वतःला महाराष्ट्राच्या जनतेच्या सेवेस व कल्याणास वाहून घेईन.

....................

....................

# अर्थसंकल्पीय अधिवेशन

# राज्यपालांचे अभिभाषण





राज्यपाल रमेश बैस यांच्या अभिभाषणाने राज्याच्या २०२३ वर्षातील अर्थसंकल्पीय अधिवेशनाला सुरुवात झाली. विधानमंडळ येथे आगमन प्रसंगी विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ नीलम गोऱ्हे, राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ व संसदीय कामकाज मंत्री चंद्रकांत पाटील यांनी राज्यपालांचे स्वागत केले. त्यानंतर राज्यपालांना पोलीस दलातर्फे मानवंदना देण्यात आली. **२७.०२.२०२३**

https://youtu.be/WJPOs14OaTg



# Governor opens Budget Session of Legislature



Maharashtra Governor Ramesh Bais addressed the inaugural joint session of the Budget Session of Maharashtra State Legislature at Vidhan Bhavan Mumbai. At the entrance to the Vidhan Bhavan, the Governor was welcomed by the Speaker of Maharashtra Legislative Assembly Rahul Narwekar, Deputy Chairperson of Legislative Council Dr Neelam Gorhe, Maharashtra Chief Minister Eknath Shinde, Deputy Speaker Narhari Zirwal and Minister of Parliamentary Affairs Chandrakant Patil. The Governor was also given a ceremonial Guard of Honour. 27.02.2023

https://youtu.be/KUdzXP0ApxY



# मा. राज्यपालांच्या अभिभाषणातील निवडक अंश

सभापती महोदय, अध्यक्ष महाराज व राज्य विधानमंडळाचे सन्माननीय सदस्यहो,

राज्य विधानमंडळाच्या, २०२३ या वर्षातीलपहिल्या अधिवेशनातआपणा सर्वांचेस्वागत करतानामला अतिशयआनंद होतआहे.

जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा

२. माझ्या शासनाने, दिनांक १९ फेब्रुवारी २०२३ पासून राज्यगीत म्हणून "जय जय महाराष्ट्र माझा" हे गीत स्वीकारले आहे.

३. माझे शासन, महाराष्ट्र-कर्नाटक सीमा विवादासंबंधात माननीय सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल केलेल्या मूळ दाव्यात महाराष्ट्राची बाजू ठामपणे मांडत आले आहे आणि यापुढेही मांडत राहील.

४. भारताच्या स्वातंत्र्याच्या ७५ वर्षाच्या निमित्ताने ७५००० शासकीय नोकर भरतीची प्रक्रिया सुरू केली आहे.

५. सन २०२२-२०२३ या वर्षामध्ये भांडवली गुंतवणुकीसाठी राज्याला विशेष सहाय्य म्हणून रूपये ८००० कोटींहून अधिक रकमेचे नियतवाटप केल्याबद्दल माननीय पंतप्रधान व केंद्र सरकार यांच्याप्रती राज्य कृतज्ञता व्यक्त करते.

६. माझ्या शासनाने, जानेवारी, २०२३ मध्ये दावोस येथील जागतिक गुंतवणूक परिषदेमध्ये, १९ कंपन्यांशी १,३७,००० हजार कोटी रूपये इतक्या गुंतवणुकीसाठी सामंजस्य करार केलेले आहेत.

७. महाराष्ट्र हे देशातील एक अग्रगण्य औद्योगिक राज्य आहे. माझे शासन, २०२६-२७ पर्यंत देशाची अर्थव्यवस्था ५ ट्रिलियन डॉलर इतकी साध्य करण्याच्या माननीय पंतप्रधानांच्या ध्येयाशी सुसंगत अशी राज्याची अर्थव्यवस्था १ ट्रिलियन डॉलर इतकी साध्य करण्यासाठी कटिबध्द आहे.

८. वस्त्रोद्योग उद्योगाला बळकटी आणण्याच्या उद्देशाने, माझे शासन, "एकात्मिक आणि शाश्वत वस्त्रोद्योग धोरण, "२०२३ - २०२८" तयार करीत आहे. त्यामुळे राज्यात रोजगाराच्या नवीन संधी देखील निर्माण होतील.

९. शाश्वत भूजल व्यवस्थापनासाठी एक हजार चारशे बेचाळीस गावांमध्ये "अटल भूजल योजना" राबविण्यात येत आहे.

१०. संयुक्त राष्ट्राने सन २०२३ हे वर्ष "आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष" म्हणून घोषित केले आहे. माझ्या शासनाने, "महाराष्ट्र पौष्टिक तृणधान्य अभियान" सुरू केले आहे.

११. दिव्यांगांच्या विशेष गरजा लक्षात घेऊन, त्यांच्यासाठी एक स्वतंत्र दिव्यांग विभाग निर्माण करण्यात आला आहे.

१२. मराठवाडा मुक्ती संग्राम दिनास ७५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने, माझे शासन, १७ सप्टेंबर, २०२२ पासून १७ सप्टेंबर, २०२३ पर्यंत मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे अमृतमहोत्सवी वर्ष म्हणून साजरे करत आहे.

पुन्हा एकदा, आपणा सर्वांना माझ्या हार्दिक शुभेच्छा.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !

# Excerpts

# Hon'ble Governor's Address to the Legislature

HON'BLE CHAIRMAN, HON'BLE SPEAKER AND HON'BLE MEMBERS OF THE STATE LEGISLATURE,

It gives me great pleasure to welcome you all to the first session of the State Legislature in the year 2023.

My Government will continue to follow the high ideals set by exemplars such as Chhatrapati Shivaji Maharaj, Mahatma Jyotirao Phule, Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj, Bharatratna Dr. Babasaheb Ambedkar, and other great visionaries and social reformers.

Jay Jay Maharashtra Maza,
Garja Maharashtra Maza

My Government has adopted "Jay Jay Maharashtra Maza" song as State anthem with effect from 19th February, 2023. With this our quest for a state anthem has been fulfilled.

After assuming office, my Government's first priority is to revitalise the post covid economy of the state and provide jobs to the youth.

As a first step, we have started the process of recruiting 75,000 government employees on the occasion of 75 years of the Independence of India.

The state would like to place on record its gratitude to the Hon'ble Prime Minister and the Union Government for allocating over Rs. 8 thousand crore as a special assistance to the state for capital investment in the year 2022-23. I am pleased to share with you the fact that as of date, Rs. 5 thousand 884 crore has already been sanctioned and the projects are well under way.

My Government has signed Memorandum of Understanding with 19 companies for an investment of Rs. 1 lakh 37 thousand crore at the Davos World Investment Conference in January 2023.

My Government has re-launched the scheme of "Honouring of the persons who fought during the emergency period". Total 4 thousand 438 beneficiaries have been included in this scheme.

My Government successfully hosted the first meeting of G-20 summit at Mumbai during 13th to 16th December, 2022 and the meeting of Infrastructure Working Group of G-20 summit at Pune during 16th and 17th January, 2023.

My Government has opened 72 "Hindu Hridaysamrat Balasaheb Thackeray - Apala Davakhana", to provide comprehensive health care services in Mumbai and it is proposed to start 18 new polyclinics and diagnostic centres and 123 " Apala Davakhana " in Mumbai by March 2023.

My Government has decided to implement the "Jalyuktta Shivar Abhiyan 2.0" in about 5000 villages through convergence of various schemes..

Hon'ble Members, in this session, Budget proposals for the new financial year, Appropriation Bills and other legislations will be put forth for your consideration. I am confident that, Hon'ble Members will participate and give their well-considered inputs on those proposals to propel Maharashtra towards greater prosperity.

Once again, I extend my warm greetings.

JAI HIND! JAI MAHARASHTRA!

**27th February 2023**

# सदिच्छा भेट

# विरोधी पक्षनेत्यांकडून राज्यपालांचे स्वागत
# Opposition Leaders welcome Governor



अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला विधान सभेतील विरोधी पक्षनेते अजित पवार व परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या नेतृत्वाखाली महाविकास आघाडीच्या विधिमंडळ सदस्यांच्या शिष्टमंडळाने राज्यपाल रमेश बैस यांची राजभवन मुंबई येथे सदिच्छा भेट घेतली. यावेळी शिष्टमंडळाने बैस यांचे राज्याच्या राज्यपाल पदी नियुक्ती झाल्याबद्दल अभिनंदन केले. यावेळी छगन भुजबळ, धनंजय मुंडे, जितेंद्र आव्हाड, अनिल पाटील, अनिल परब, सुनील प्रभु, विनोद निकोले, कपिल पाटील हे देखील उपस्थित होते. २०.०२.२०२३

A delegation of legislators of the Maha Vikas Aghadi led by the Leader of the Opposition in the Maharashtra Legislative Assembly Ajit Pawar and Leader of the Opposition in the Legislative Council Ambadas Danve met Maharashtra Governor Ramesh Bais at Raj Bhavan Mumbai. The delegation congratulated the Governor on his appointment as the State Governor.

Members of the State Legislature Chhagan Bhujbal, Dhananjay Munde, Jitendra Awhad, Anil Patil, Anil Parab, Sunil Prabhu, Vinod Nikole and Kapil Patil were present. 26.02.2023

# काँग्रेस शिष्टमंडळाने घेतली राज्यपालांची भेट

# Congress delegation calls on Governor






महाराष्ट्र विधानमंडळ काँग्रेस पक्षाच्या एका शिष्टमंडळाने बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली राज्यपाल रमेश बैस यांची राजभवन येथे सदिच्छा भेट घेतली. यावेळी अशोक चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण, नाना पटोले, डॉ. नितीन राऊत, सुनिल केदार, अभिजित वंजारी आदी उपस्थित होते. ०९.०३.२०२३

A delegation of Maharashtra Congress Legislature Party led by Balasaheb Thorat called on Governor Ramesh Bais at Raj Bhavan, Mumbai. This was a courtesy call.

Senior members Ashok Chavan, Prithviraj Chavan, Dr. Nitin Raut, Nana Patole, Sunil Kedar, Abhijit Wanjari and others were present. 09.03.2023

# सदिच्छा भेट

# Courtesy Call



बिहारचे राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांनी महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस यांची राजभवन, मुंबई येथे सदिच्छा भेट घेतली. १९.०२.२०२३

The Governor of Bihar Rajendra Arlekar called on the Governor of Maharashtra Ramesh Bais at Raj Bhavan, Mumbai. This was a courtesy meeting. 19.02.2023



महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस यांनी छत्तीसगडचे राज्यपाल विश्वभूषण हरिचंदन यांची राजभवन, रायपूर येथे सदिच्छा भेट घेतली. २३.०२.२०२३

Maharashtra Governor Ramesh Bais met the Governor of Chhattisgarh Biswabhusan Harichandan at Raj Bhavan Raipur. This was a courtesy meeting. 23.02.2023

# सदिच्छा भेट

# Courtesy Call



राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यपाल रमेश बैस यांची राजभवन येथे सदिच्छा भेट घेतली. २२.०२.२०२३

Deputy Chief Minister Devendra Fadnavis met Maharashtra Governor Ramesh Bais at Raj Bhavan Mumbai. 22.02.2023



महाराष्ट्राचे पोलीस महासंचालक रजनीश सेठ यांनी राज्यपाल रमेश बैस यांची राजभवन, मुंबई येथे सदिच्छा भेट घेतली. २१.०२.२०२३

The Director General of Police Rajnish Seth called on Maharashtra Governor Ramesh Bais at Raj Bhavan, Mumbai. This was a courtesy meet. 21.02.2023



महाराष्ट्रचे नवनियुक्त राज्यपल श्री रमैश बैंस यांची राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसायमंत्री श्री सुधीर मुनगंटीवार यांनी आज मुंबईत राजभवन येथे सदिच्छा भेट घेत त्यांचे स्वागत केले.

यावेळी ना.श्री सुधीर मुनगंटीवार यांनी महामहिम राज्यपालांना बांबूपासून निर्मित बोलका ध्वज आणि 'शिवाजी द ग्रेट मराठा' व 'सावरकर - विस्मृती चे पडसाद' ही पुस्तके भेट देऊन स्वागत केले व यशस्वी कारकिर्दीसाठी शुभेच्छा दिल्या.

नूतन राज्यपाल श्री रमेश बैंस हे एक अभ्यासू व कणखर व्यक्तिमत्व असून महाराष्ट्रातील लोकशाही व्यवस्थेला, राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्राला त्यांच्या मार्गदर्शनाचा उत्तम उपयोग होईल, असे मत ना.श्री सुधीर मुनगंटीवार यांनी राज्यपालांच्या भेटीनंतर व्यक्त केले. महाराष्ट्रासारख्या मोठ्या राज्यात राज्यपालांचे मार्गदर्शन फार महत्वाचे असते, हे या आधीही सिद्ध झाले आहे. नवीन राज्यपाल अत्यंत अनुभवी कुशल असून त्यांची कारकिर्द मोलाची ठरेल असे ते म्हणाले. २६.०२.२०२३

Minister of Forest, Cultural Affairs and Fisheries Sudhir Mungantiwar met State Governor Ramesh Bais at Raj Bhavan Mumbai. 26.02.2023



महाराष्ट्राचे माजी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी राज्यपाल रमेश बैस यांची महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली येथे सदिच्छा भेट घेतली. **२८.०२.२०२३**

Former Governor of Maharashtra Bhagat Singh Koshyari met the Governor of Maharashtra Ramesh Bais at Maharashtra Sadan, New Delhi. This was a courtesy call. 28.02.2023



पंजाबचे राज्यपाल बनवारीलाल पुरोहित यांनी आज राज्यपाल रमेश बैस यांची राजभवन मुंबई येथे सदिच्छा भेट घेतली. **११.०३.२०२३**

Punjab Governor Banwarilal Purohit met Maharashtra Governor Ramesh Bais at Raj Bhavan Mumbai. This was a courtesy meeting. 11.03.2023

# सदिच्छा भेट Courtesy Call







भारतीय पोलीस सेवेच्या २०२१ च्या तुकडीतील परिविक्षाधीन अधिकाऱ्यांनी राज्यपाल रमेश बैस यांची राजभवन मुंबई येथे सदिच्छा भेट घेतली. ०९.०३.२०२३

A group of 11 Probationary officers of the Indian Police Service of the 2021 Batch called on Maharashtra Governor Ramesh Bais at Raj Bhavan, Mumbai. 09.03.2023

# सदिच्छा भेट

# Courtesy Call



राज्याच्या कौशल्य विभागाच्या प्रधान सचिव मनीषा वर्मा यांनी महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरु डॉ अपूर्वा पालकर यांचेसह राज्यपाल रमेश बैस यांची राजभवन येथे भेट घेतली. ०६.०३.२०२३

Principal Secretary Skill Development , Employment & Entrepreneurship Manisha Verma accompanied by Vice Chancellor of Maharashtra State Skills University Dr Apoorva Palkar met Governor Ramesh Bais at Raj Bhavan, Mumbai. 06.03.2023



गडचिरोली येथील गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरु डॉ प्रशांत बोकारे यांनी राज्यपाल तथा विद्यापीठांचे कुलपती रमेश बैस यांची राजभवन येथे सदिच्छा भेट घेतली व विद्यापीठाच्या कामकाजाची माहिती दिली. ०६.०३.२०२३

Vice Chancellor of the Gondwana University Gadchiroli Dr Prashant Bokare called on State Governor and Chancellor of public universities in Maharashtra Ramesh Bais at Raj Bhavan Mumbai. The Vice Chancellor apprised the Governor of the work of the University. 06.03.2023



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु डॉ सुभाष चौधरी यांनी राज्यपाल तथा विद्यापीठांचे कुलपती रमेश बैस यांची राजभवन येथे सदिच्छा भेट घेतली. यावेळी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ संजय दुधे देखील उपस्थित होते. १०.०३.२०२३

Vice Chancellor of the Rashtra Sant Tukadoji Maharaj Nagpur University Dr Subhash Chaudhari called on State Governor and Chancellor of public universities in Maharashtra Ramesh Bais at Raj Bhavan Mumbai. Pro Vice Chancellor Dr Sanjay Dudhe was also present. 10.03.2023



एचएसएनसी समूह विद्यापीठाच्या कुलगुरु डॉ हेमलता बागला यांनी राज्यपाल तथा विद्यापीठांचे कुलपती रमेश बैस यांची राजभवन येथे सदिच्छा भेट घेतली व विद्यापीठाच्या कामकाजाची माहिती दिली. ११.०३.२०२३

Vice Chancellor of the HSNC University Dr Hemlata Bagla called on Governor and Chancellor of public universities in Maharashtra Ramesh Bais at Raj Bhavan Mumbai. Dr Bagla apprised the Governor of the work of the University. 11.03.2023

# शिक्षण

# केंद्रीय मंत्री नितीन गडकरी डि.लिट. ने सन्मानित

# 25th Annual Convocation of STRMU






नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा २५ वा दीक्षांत समारंभ राज्यपाल तसेच विद्यापीठाचे कुलपती रमेश बैस यांच्या दुरस्थ उपस्थितीत विद्यापीठ परिसर येथे संपन्न झाला.

या दीक्षांत समारंभामध्ये केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी तसेच राज्याचे माजी शिक्षण मंत्री कमलकिशोर कदम यांना डि.लीट. ही मानद पदवी देऊन सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाला होमी भाभा राष्ट्रीय संस्थेचे कुलपती तसेच राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोगाचे अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर हे दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून उपस्थित होते. यावेळी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. उद्धव भोसले आणि प्र-कुलगुरु डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, कुलसचिव डॉ. सर्जेराव शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. दिगंबर नेटके तसेच विविध विभागांचे अधिष्ठाता, प्राध्यापक व स्नातक विद्यार्थी उपस्थित होते. २४.०२.२०२३

Maharashtra Governor and Chancellor of state universities Ramesh Bais presided over the 25th Annual Convocation of the Swami Ramanand Teerth Marathwada University (SRTMU), Nanded through online mode.

The Honorary degree of Doctor of Letters (D.Litt.) was conferred on Union Minister of Road Transport and Highways Nitin Gadkari and former Maharashtra Education Minister Kamalkishor Kadam.

Chancellor of the Homi Bhabha National Institute and Chairman of Rajiv Gandhi Science and Technology Commission Dr. Anil Kakodkar delivered the Convocation address through online mode.

Dr. Udhav Bhosle, Vice Chancellor of SRTMU, Dr. Jogendrasingh Bisen, Pro Vice Chancellor, Dr. Sarjerao Shinde, Registrar, Dr. Digambar Netke, Director of Board of Examinations and Evaluation, Deans of various faculties, teachers and graduating students were present. 24.02.2023

# कृषि विद्यापीठाचा दीक्षांत समारोह संपन्न

# 41st Convocation of Konkan Krishi Vidyapeeth




राज्यपाल तथा कुलपती रमेश बैस यांच्या प्रमुख उपस्थितीत दापोली येथील डॉ बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाचा ४१ वा दीक्षांत समारोह आज संपन्न झाला. यावेळी विशेष प्राविण्य प्राप्त केलेल्या स्नातकांना सुवर्णपदके प्रदान करण्यात आली. सुरुवातीला राज्यपालांनी कृषि प्रदर्शनाला भेट दिली.

दीक्षांत समारोहाला विद्यापीठाचे प्रकुलपती व कृषिमंत्री अब्दुल सत्तार, रत्नागिरीचे पालक मंत्री तसेच उद्योग मंत्री उदय सामंत, भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे माजी महासंचालक व इंफाळ येथील केंद्रीय कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ एस अय्यप्पन, डॉ बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ संजय सावंत, विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेचे सदस्य, विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता, शिक्षक व स्नातक विद्यार्थी उपस्थित होते. १५.०३.२०२३

Maharashtra Governor and Chancellor of public Universities in the State Ramesh Bais presided over the 41st Annual Convocation of the Dr Balasaheb Sawant Konkan Krishi Vidyapeeth (DBSKKV) at Dapoli in Ratnagiri District.

Pro Chancellor of the University and Maharashtra's Agriculture Minister Abdul Sattar, Guardian Minister of Ratnagiri Uday Samant, former Director General of IACR and Vice Chancellor of Central Agriculture University Imphal Dr S. Ayyappan, Vice Chancellor of DBSKKV Dr Sanjay Sawant, Members of the Executive Council, Dean of various faculties and graduating students were present. 15.03.2023

https://youtu.be/jIOQeNegpPU

# भेटी व कार्यक्रम

# शिवरायांना अभिवादन





छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३९३ व्या जयंतीनिमित्त राज्यपाल रमेश बैस यांनी छत्रपती शिवाजी महाराज पार्क, मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी आमदार सदानंद सरवणकर, मुंबई महानगर पालिका आयुक्त इक्बाल सिंह चहल, श्री छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समितीचे अध्यक्ष किसन जाधव, पालिकेचे अतिरिक्त आयुक्त पी. वेलरासू आदी उपस्थित होते. अभिवादन सोहळ्यानंतर राज्यपाल क्रीडा भवन येथे महानगरपालिकेतर्फे आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमाला देखील उपस्थित राहिले. यावेळी संगीत कला अकादमीतर्फे छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित पोवाडा, समूहगायन व देशभक्तीपर गीतांचा कार्यक्रम सादर करण्यात आला. **१९.०२.२०२३**

https://youtu.be/kUpGSbqKcaU



# Shiv Jayanti Celebrations



Maharashtra Governor Ramesh Bais garlanded the equestrian statue of Chhatrapati Shivaji Maharaj at Chhatrapati Shivaji Maharaj Park in Mumbai on the occasion of Shiv Jayanti. Governor Ramesh Bais later participated in the Shiv Jayanti celebrations organized by the Brihanmumbai Municipal Corporation (BMC) and listened to the patriotic songs on the life of Chhatrapati Shivaji Maharaj. Member of Maharashtra State Legislature Sadanand Sarvankar, Brihanmumbai Municipal Commissioner I.S. Chahal, Chairman of the Shri Chhatrapati Shivaji Maharaj Smarak Samiti Kisan Jadhav, Additional Municipal Commissioner P. Velarasu, officials and invitees were present. 19.02.2023

https://youtu.be/kUpGSbqKcaU

# कुटुंब मिशन आणि सर्वांगीण ग्रामसमृद्धी योजनेचा शुभारंभ संपन्न




राज्यपाल रमेश बैस यांच्या प्रमुख उपस्थितीत महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार ग्रामीण रोजगार हमी योजना महाराष्ट्र आणि शासनाच्या १७ विभागांच्या योजनांचे अभिसरण करून तयार करण्यात आलेल्या 'सुविधा संपन्न कुटुंब मिशन' आणि 'सर्वांगीण ग्रामसमृद्धी' योजनेचा शुभारंभ करण्यात आला.

यशवंतराव चव्हाण सभागृह, मुंबई येथे झालेल्या कार्यक्रमाला राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, रोहयो आणि फलोत्पादन मंत्री संदीपान भुमरे, आमदार आशिष जयस्वाल आणि महेंद्र दळवी, शासनाचे अपर मुख्य सचिव नंद कुमार, मनरेगा आयुक्त शंतनू गोयल, लोकप्रतिनिधी तसेच राज्याच्या विविध जिल्ह्यांमधून आलेले अधिकारी उपस्थित होते.

यावेळी राज्यपाल व मुख्यमंत्र्यांच्या हस्ते राज्याच्या विविध भागांमधील कार्यक्षम अधिकारी - कर्मचारी यांचा सत्कार करण्यात आला. रोजगार हमी योजना विभागाचे संकेतस्थळ, फलोत्पादनची मागणी ऑनलाईन करण्याकरिता तयार करण्यात आलेली मोबाईल ॲप्लिकेशन, महात्मा गांधी नरेगा केंद्र महाराष्ट्र - माहिती आणि तक्रार निवारण टोल फ्री क्रमांक तसेच 'यशोगाथा' या स्मरणिकेचे देखील यावेळी उदघाटन करण्यात आले. **०३.०३.२०२३**

https://youtu.be/tHC0_AXErDw

# ‘Kutumb Mission and Gram Samruddhi Yojana’ launched




Maharashtra Governor Ramesh Bais inaugurated the 'Suvidha Sampanna Kutumb Mission' and 'Sarvangin Gram Samruddhi Yojana' through the convergence of schemes of 17 various departments with Mahatma Gandhi National Rural Employment Guarantee Scheme at a programme in Mumbai.

The Governor accompanied by Chief Minister Eknath Shinde inaugurated the website of EGS, Mobile Application for online transaction of Horticultural products, Toll free Helpline, Yashogatha publication and Yashogatha video series and MGNREGA Song on this occasion.

Officers and employees tasked with the implementation of MGNREGA in various districts were also felicitated for exceptional work.

Minister of EGS and Horticulture Sandipan Bhumre, MLAs Ashish Jaiswal and Mahendra Dalvi, Additional Chief Secretary Nand Kumar, Commissioner MGNREGA Shantanu Goel, people's representatives and district officials were present. 03.03.2023

https://youtu.be/tHC0_AXErDw

# विकास रात्र विद्यालयाला भेट




राज्यपाल रमेश बैस यांनी मुंबईतील सांताक्रुझ येथील उपनगर शिक्षण मंडळातर्फे संचालित विकास रात्र विद्यालयाला भेट दिली व उदरनिर्वाहासाठी काम करून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष आणि नागालँडचे माजी राज्यपाल पद्मनाभ आचार्य, रात्र शाळा समितीचे अध्यक्ष चंद्रहास देशपांडे, मंडळाचे कार्याध्यक्ष संजीव मंत्री, विकास रात्र विद्यालयाचे प्राचार्य दीपक कोतेकर, शिक्षक, विदयार्थी व आश्रयदाते उपस्थित होते. राज्यपालांच्या हस्ते रात्रशाळेत शिक्षण घेतलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी पारस इंटरमिजिअरीस लिमिटेड या उद्योग समूहाच्या वतीने संस्थेला विद्यार्थ्यांच्या उपयोगासाठी लॅपटॉप देण्यात आले. **०६.०३.२०२३**




https://youtu.be/E6S7KoC9LBY

# Visit to Night School




The Governor of Maharashtra Ramesh Bais visited the Vikas Ratra Vidyalaya run by the Upanagar Shikshan Mandal and interacted with the students at the institute's premises at Santacruz, Mumbai. The Governor felicitated the meritorious students from the Andheri and Santacruz Night Schools on the occasion. Laptops were presented by Paras Intermediaries Ltd to the School for use by the students.

Chairman of the Upanagar Shikshan Mandal and former Nagaland Governor P. B. Acharya, Chairman of the Night School Committee Chandrahas Deshpande, Working Chairman Sanjeev Mantri, Principal of Vikas Ratra Vidyala Deepak Kotekar, teachers, students and patrons were present. 06.03.2023

https://youtu.be/E6S7KoC9LBY

# पाचवा ‘जन औषधी दिवस साजरा’




प्रधानमंत्री भारतीय जन औषधी योजनेच्या अंतर्गत पाचवा 'जन औषधि दिवस' तसेच ‘जागतिक महिला दिन’ या दिवसांचे औचित्य साधुन राज्यस्तरीय ‘जन चेतना’ अभियानाचे उदघाटन राज्यपाल रमेश बैस यांच्या उपस्थितीत यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई येथे करण्यात आले.

यावेळी राज्यपालांच्या हस्ते 'जन औषधी ज्योती', 'जन औषधी सर्वश्रेष्ठ' व 'जन औषधी मित्र' पुरस्कारांचे वितरण करण्यात आले, तसेच जागतिक महिला दिनानिमित्त आरोग्य सेवेत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या महिला अधिकारी, कर्मचारी व आशा सेविकांच्या सत्कार करण्यात आला.

राज्यपालांच्या हस्ते सोलापूर जिल्यातील जनऔषधी केंद्राचे दूरदृश्य प्रणालीद्वारे उदघाटन करण्यात आले. कार्यक्रमाला केद्रींय आरोग्य राज्यमंत्री डॉ. भारती पवार, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री डॉ. तानाजी सावंत, सार्वजनिक आरोग्य विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे, सचिव २ नवीन सोना तसेच विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी, आशा सेविका व इतर मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे करण्यात आले. ०८.०३.२०२३

https://youtu.be/N9BtiF-v1aM

# 5th Jan Aushadhi Diwas Celebrations




Maharashtra Governor Ramesh Bais presided over the fifth 'Jan Aushadhi Diwas' celebrations organized as part of the ‘Pradhan Mantri Bharatiya Jan Aushadhi Yojana’ at Yashwantrao Chavan Pratishthan in Mumbai. The programme was organized on the day of International Women’s Day.

The Governor inaugurated through a digital platform an outlet of the 'Pradhan Mantri Jan Aushadhi Kendra' at Khune, Tq. Akkalkot in Solapur district.

Union Minister of State for Public Health Dr. Bharati Pawar, Maharashtra's Public Health and Family Welfare Minister Dr Tanaji Sawant, Principal Secretary Public Health Sanjay Khandare, Secretary Nawin Sona and ASHA workers were present.

The Governor presented the 'Jan Aushadhi Jyoti', 'Jan Aushadhi Sarvashreshtha' and 'Jan Aushadhi Mitra' awards. Women doctors, officers, staff and ASHA workers were felicitated for doing excellent work in health service. The programme was organized with the initiative of the Public Health Department of Government of Maharashtra. 08.03.2023

https://youtu.be/N9BtiF-v1aM

# महिला यशस्विता सन्मानित




राज्यपाल रमेश बैस यांच्या प्रमुख उपस्थितीत कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या वतीने 'जागतिक महिला दिन सन्मान' सोहळ्याचे एल्फिन्स्टन टेक्निकल हायस्कुल मुंबई येथे आयोजन करण्यात आले. यावेळी राज्यपालांच्या हस्ते राज्यातील ४३ यशस्वी महिला उद्योजिका तसेच कौशल्य स्पर्धा विजेत्यांचा सत्कार करण्यात आला.

राज्यपालांच्या हस्ते यावेळी महाराष्ट्र व्हर्च्युअल इन्क्युबेशन सेंटर व महाराष्ट्र इनोव्हेशन अँड टेक्नॉलॉजिकल डेव्हलपमेंट फंडचे देखील उदघाटन करण्यात आले.

कार्यक्रमाला कौशल्य, पर्यटन व महिला व बालकल्याण मंत्री मंगलप्रभात लोढा, कौशल्य विभागाच्या प्रधान सचिव मनिषा वर्मा, महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरु डॉ अपूर्वा पालकर व महाराष्ट्र स्टेट इनोव्हेशन सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ रामास्वामी एन. प्रामुख्याने उपस्थित होते. **०८.०३.२०२३**

https://youtu.be/blHTs-gYGtA

# Governor felicitates women entrepreneurs







Maharashtra Governor Ramesh Bais presented the 'International Women's Day Awards' to 43 successful women entrepreneurs and winners of various Skill competitions on the occasion of the International Women's Day at Elphinstone Technical High School in Mumbai. The felicitation was organized by the Skills, Employment, Entrepreneurship and Innovation Department of Government of Maharashtra.

The Governor e-launched the Maharashtra Virtual Incubation Centre and the Maharashtra Innovation and Technological Development Fund on the occasion.

Minister of Skills, Tourism and Women and Child Development Mangal Prabhat Lodha, Principal Secretary, Skills, Manisha Verma, Vice Chancellor of Maharashtra State Skills University Dr Apoorva Palkar and CEO of Maharashtra State Innovation Society Dr Ramaswamy N. were present.

08.03.2023

https://youtu.be/blHTs-gYGtA

# सिद्धिविनायक मंदिराला भेट

# visits Siddhivinayak Temple



नवनियुक्त राज्यपाल रमेश बैस यांनी शपथविधी नंतर सिध्दीविनायक मंदिरात जाऊन श्री गणेशाचे दर्शन घेतले. यावेळी त्यांच्या पत्नी रामबाई बैस तसेच कुटुंबीय उपस्थित होते. त्यानंतर राज्यपालांनी महालक्ष्मी मंदिर येथे जाऊन देवीचे दर्शन घेतले. १८.०२.२०२३

Maharashtra Governor Ramesh Bais visited the Shri Siddhivinayak temple in Mumbai after assuming the charge of his post.Smt. Rambai Bais and family members of the Governor were present. 18.02.2023

https://youtu.be/PJxEkMv7YZQ

# राज्यपालांनी घेतले महालक्ष्मीचे दर्शन

# Governor visits Mahalakshmi Temple



महाराष्ट्राचे नवनियुक्त राज्यपाल रमेश बैस आज सपत्नीक मुंबईतील महालक्ष्मी मंदिर येथे जाऊन देवीचे दर्शन घेतले. १८.०२.२०२३

Maharashtra Governor Ramesh Bais accompanied by Smt Rambai Bais visited the Shri Mahalaxmi Mandir in Mumbai. 18.02.2023

# राजभवन परिवार

# यशवंतराव चव्हाण यांना अभिवादन

# Tributes for Y B Chavan



देशाचे माजी उपपंतप्रधान व महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या ११० व्या जयंतीनिमित्त राज्यपाल रमेश बैस यांनी राजभवन येथे त्यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केले. यावेळी राजभवनातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. १२.०३.२०२३

Maharashtra Governor Ramesh Bais offered floral tributes to the portrait of former Deputy Prime Minister of India and Maharashtra's first Chief Minister Yashwantrao Chavan on the occasion of the 110th Birth Anniversary of late Shri Chavan at Raj Bhavan Mumbai. 12.03.2023



# ‘क्रांतिगाथा’ संग्रहालयाची पाहणी; श्री गुंडी मंदिराला भेट



राज्यपाल रमेश बैस यांनी राजभवन मुंबई येथील ब्रिटिश कालीन भूमिगत बंकरमध्ये तयार करण्यात 'क्रांती गाथा' या स्वातंत्र्य लढ्यातील क्रांतिकारकांच्या दालनाला भेट दिली. यावेळी तेथील ऐतिहासिक गोष्टींची माहिती जाणून घेतली.

त्यानंतर राज्यपालांनी राजभवन येथील प्राचीन श्रीगुंडी देवी मंदिरात जाऊन देवीची सपत्नीक आरती केली. राज्यपालांनी नव्याने स्थापन करण्यात आलेल्या भव्य शिवमूर्तीचे देखील दर्शन घेतले. **१९.०२.२०२३**





# Visit to 'Kranti Gatha' Gallery; Sri Gundi Mandir



Governor Ramesh Bais visited 'Kranti Gatha' the Gallery of Indian Revolutionaries created inside the underground British - era bunker in Raj Bhavan, Mumbai. Accompanied by wife Smt Rambai, the Governor performed the aarti at the ancient Sri Gundi Devi Mandir in the Raj Bhavan premises. The Governor also admired the statue of Lord Shiva installed a few months ago. 19.02.2023



https://youtu.be/SNb67sc51V0



संत गाडगे बाबा यांच्या जयंतीनिमित्त राज्यपाल रमेश बैस यांनी राजभवन येथे संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केले. यावेळी राज्यपालांच्या पत्नी रामबाई बैस यांनी देखील संत गाडगे बाबांच्या प्रतिमेला अभिवादन केले. राजभवनातील अधिकारी, कर्मचारी तसेच पोलीस अधिकारी व कर्मचारी यावेळी उपस्थित होते. २३.०२.२०२३

Maharashtra Governor Ramesh Bais accompanied by Smt. Rambai Bais offered floral tributes to the portrait of Sant Gadge Baba on the occasion of Gadge Baba's birth anniversary at Raj Bhavan, Mumbai. Officers and staff of Raj Bhavan and police personnel were present. 23.02.2023

# सदिच्छा भेट




राज्यपाल रमेश बैस यांनी आज केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची राजधानी नवी दिल्ली येथे सदिच्छा भेट घेतली. ०१.०३.२०२३

Maharashtra Governor Ramesh Bais called on the Union Home Minister Amit Shah in New Delhi. This was a courtesy call. 01.03.2023



राजभवन, महाराष्ट्र